औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंब्रा, जिल्हा ठाणे या संस्थेच्या कार्यशाळा व प्रशासकीय इमारत बांधकामासाठी अनुदान उपलब्ध करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः औप्रसं-२०११/प्र.क्र. ९२/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२
दिनांक: ८ डिसेंबर, २०१७.

वाचा -

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : आयटीआय-२०११/प्र.क्र.११२/व्यशि-३, दि.०७ मे, २०१२,
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्रशामा-२०१३/प्र.क्र. १२०/व्यशि-२, दि.०१ सप्टेंबर, २०१४.
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र: अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७.
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र: अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३० जून, २०१७.
५) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे मागणीपत्र क्र. १२/नियोजन/२०१७/प्र.क्र.५६/१४६, दि.६ ऑक्टोबर, २०१७.

प्रस्तावना -

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये "मुंब्रा-कौसा, जिल्हा ठाणे" या ठिकाणी अल्पसंख्यांकांसाठी नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यास, "सदर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यासाठी पदनिर्मिती, प्रस्तावित योजनेकरिता जागा उपलब्ध झाल्यानंतर इमारत बांधकाम, साधनसामुग्री व यंत्रसामुग्री इ. साठी लागणाऱ्या अपेक्षित खर्चाकरिता अल्पसंख्याक विकास विभागाकडून अनुदान उपलब्ध होईल" या अटीच्या अधीन राहून तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.

संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि. १ सप्टेंबर, २०१४ अन्वये औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंब्रा, जिल्हा ठाणे या संस्थेच्या कार्यशाळा व प्रशासकीय इमारत बांधकामाकरिता रू.११,९१,०९,९४६/- (अक्षरी रूपये अकरा कोटी एक्यान्नव लक्ष नऊ हजार नऊशे शेहचाळीस फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. अल्पसंख्यांकांसाठी नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यासाठी सन २०१७-१८ करिता "मागणी क्रमांक झेडई-१, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २००- इतर कार्यकम, (०१) (०६) अल्पसंख्याक वस्तीतील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदान देण्यासाठी सहाय्यक अनुदान, (२२३५ ए १२२) ३१ - सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली रु.२,००,००,०००/-(अक्षरी रू. दोन कोटी फक्त) इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.३ च्या परिपत्रकान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील प्रथम नऊ माहीकरिता आवश्यक असणारा अनिवार्य कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पित निधीच्या एकूण वार्षिक तरतूदीच्या ८०% च्या मर्यादेत म्हणजेच

रू.१,६०,००,०००/-(अक्षरी रू. एक कोटी साठ लक्ष फक्त) निधी उपलब्ध करण्यात आला. तथापि वित्त विभागाच्या संदर्भ क्र.४ येथील परिपत्रकान्वये सन २०१७-१८ या वर्षाकरिता महसूली लेख्यांतील निधी वितरणाची मर्यादा ७०% इतकी करण्यात आली आहे. त्यानुसार सन २०१७-१८ करिता या योजनेकरिता बी.डी.एस. प्रणालीवर रू.१,४०,००,०००/- (अक्षरी रू.एक कोटी चाळीस लक्ष फक्त) निधी उपलब्ध आहे. या बांधकामासाठी संदर्भ क्रमांक ५ येथील पत्रान्वये संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंब्रा, जि. ठाणे या संस्थेच्या कार्यशाळा व प्रशासकीय इमारत बांधकामासाठीनिधी देण्याची विनंती केली आहे. त्याअनुषंगाने निधी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंब्रा, जि. ठाणे या संस्थेच्या कार्यशाळा व प्रशासकीय इमारत बांधकामासाठी रू.१,००,००,०००/- (अक्षरी रूपये एक कोटी फक्त) इतकी तरतूद वितरीत करण्यास वरिष्ठ सचिव समितीने मान्यता देतांना नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर रक्कम संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत असून याकरिता ते “नियंत्रक अधिकारी” म्हणून काम पाहतील. तसेच त्यांनी नेमून दिलेला अधिकारी “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून काम पाहील.

२. सदर रक्कम वितरीत करण्यापूर्वी संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी, शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय/ कार्यालयीन आदेश/वित्तीय नियमावली/कार्यालयीन आदेश/सार्वजनिक बांधकाम विभागाची कार्य नियमावली/भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे निरिक्षण अहवाल/वित्तीय कार्यपध्दती यांचा अवलंब करावा. तसेच सदर रक्कम चालू आर्थिक वर्षात उपयोगात आणणे आवश्यक राहील. सदर निधी कोणत्याही संस्थेत ठेव स्वरुपात जमा करता येणार नाही.

३. या योजनेअतंर्गत अल्पसंख्याक समाजातील विदयार्थ्यांना प्रवेश देण्यात येऊन त्याचा तपशील वेळोवेळी अल्पसंख्याक विकास विभागास सादर करावा. तसेच सदर अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे व केलेल्या खर्चाचा तपशील व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित मुदतीत शासनास व महालेखापाल कार्यालयास सादर करावे.

४. यावर होणारा खर्च “मागणी क्रमांक झेडई-१, २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २००- इतर कार्यकम, (०१) (०६) अल्पसख्याक वस्तीतील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना अनुदान देण्यासाठी सहाय्यक अनुदान, (२२३५ ए १२२) ३१ - सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)” या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षाकरिता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. “ सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग पहिला, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दि. १७ एप्रिल, २०१५ अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त

झालेल्या अधिकारांतर्गत किंवा त्या त्या विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद ७ ते १८ येथील अटींची व त्यासोबतच्या परिशिष्टांमधील अ.क्र. ३ व ९ मधील अटींची तसेच वित्त विभागाच्या दि.३० जून, २०१७ च्या परिपत्रकातील अटींची पुर्तता होत असून प्राप्त मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. ”

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२०८१२५७१०७९१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samir Ramesh Salunkhe

Digitally signed by Samir Ramesh Salunkhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ba9951375d8539e02179fc093b36c7c7d7a866fc20f129ea0ff67bbde52fa539, cn=Samir Ramesh Salunkhe
Date: 2017.12.08 13:02:06 +05'30'

(समीर साळुंखे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई,
४) प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ,
६) प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंब्रा, जि. ठाणे
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे
९) संबधित जिल्हा कोषागार अधिकारी, (संचालक, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालय यांचे मार्फत)
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
११) नियोजन विभाग का. १४७५,
१२) वित्त विभाग, व्यय-४/ अर्थ-३ व १४,
१३) अवर सचिव (का. ७), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदर निधी संबंधितांना BDS वर कृपया तात्काळ उपलब्ध करुन दयावा.
१४) निवडनस्ती (का.८).